# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागातील कारवायांना पायबंद घालण्याबाबत

**(१) ५३ (२५-०३-२०२०). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागातील कारवायांना पायबंद बसावा यासाठी तेथे कार्यरत असलेल्या पोलीसांचे नेटवर्क बळकट करण्याची दिर्घ कालीन योजना ६ वर्षापुर्वी राज्याचे तत्कालीन गृहमंत्री आर.आर.पाटील यांनी आखली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गतच्या पोलीसांच्या गुप्त बातमीदारांना मोठी आर्थिक मदत देण्यासाठी प्रलंबित असलेल्या २.८० कोटी रुपयांची मागणी गत ८ महिन्यापासून शासनाच्या मंजूरीसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा प्रलंबित असलेला निधी मंजूरीबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. अनिल देशमुख (२२-०२-२०२१) :** (१) होय.

(२) नाही.

(३) शासन निर्णय गृह विभाग क्रमांक- एनएएक्स- ०९१९/प्र.क्र.२०३/विशा- १ ब, दिनांक २७/११/२०१९ अन्वये निधी मंजूर केलेला आहे.

---

### कोपरखैरणे (नवी मुंबई) येथील पोलीस स्टेशनची इमारत बांधण्याबाबत

**(२) १३७ (२२-०३-२०२०). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरखैरणे (नवी मुंबई) येथील पोलीस ठाणे सद्यस्थितीत भाडेतत्वावर सिडकोच्या इमारतीत अपुऱ्या जागेमध्ये सुरु असून कोपरखैरणे पोलीस स्टेशन बांधण्यासाठी सिडकोकडून भूखंड हस्तांतरित झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत पोलीस स्टेशन अपुऱ्या जागेमध्ये सुरु असल्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यासह पोलीस स्टेशनमध्ये कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांचीही गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस स्टेशनच्या इमारतीकरीता उपलब्ध असलेल्या भूखंडावर पोलीस स्टेशनची इमारत उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१८-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सिडको, नवी मुंबई, यांचेकडून कोपरखैरणे पोलीस ठाणेसाठी भूखंड वाटप करण्यात आला असून पोलीस ठाणे नवीन प्रशासकीय इमारतीचे सिडको मार्फत बांधकाम करण्यास शासन ज्ञापन दिनांक १२.०२.२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) नवी मुंबई यांचे मार्फत कोपरखैरणे पोलीस ठाण्याची नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर येथील केबल लाईन व्यवसायीकाकडे खंडणी मागितल्याबाबत

**(३) १७६ (२२-०३-२०२०). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर कॅम्प नं.५, सेक्शन ३५ मधील स्वतःच्या कार्यालयासमोर उभे असलेल्या केबल लाईन व्यवसायीकाकडे दिनांक ०३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास दिपक सोंडे व त्याच्या ४ हस्तकांनी जीवे मारण्याची धमकी देऊन एक कोटीची खंडणी मागितली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिपक सोंडे हा नगरसेविकेचा पती असून याप्रकरणी हील लाईन पोलीस ठाण्यात केबल लाईन व्यवसायीकाने तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारीनुसार खंडणीखोर आरोपींना पकडण्याच्या अनुषंगाने पोलिसांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२६-०२-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर गुन्ह्यातील आरोपी दिपक सोंडे यास अटक करण्यात आली आहे व तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पर्यटन स्थळी होणारे अपघात टाळण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(४) १८१ (२२-०३-२०२०). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), अॅड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सांधण व्हॅली परिसरात एका आयोजकाने ५०० ते ६०० जणांचा गट येथे आणल्याचे निदर्शनास आले असून या निसर्गरम्य स्थळी ट्रेकच्या नावाखाली क्षमतेपलीकडे झालेली गर्दी अपघातास कारणीभूत ठरण्याची शक्यता निर्माण झाल्याने अनुभवी ट्रेकर्सकडून चिंता व्यक्त केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच लोणावळा, भंडारदरा परिसरातील अनेक ट्रेकिंग स्पॉट परिसरात पर्यटक डीजे लावून मद्यपान करीत असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशाच प्रकारे अनेक पर्यटन स्थळी पाण्याचा अंदाज न आल्याने बुडणे, सेल्फीच्या नादात दरीत पडणे अशा कारणांमुळे अनेक पर्यटकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी होणारे अपघात टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२५-०२-२०२१) :** (१) सांधन व्हॅली परिसरात एका आयोजकाने ५०० ते ६०० जणांचा गट आणल्याची बाब खरी नाही.

सांधन व्हॅली हे पर्यटनस्थळ राजुर पोलीस स्टेशनचे हद्दीत, ता. अकोले, जि.अहमदनगर येथे आहे. सदर पर्यटनांचे ठिकाणी सलग सुट्यांच्या कालावधीत पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. त्यावेळी सांधन व्हॅली या पर्यटनस्थळाचे परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सांधन व्हॅली या पर्यटनस्थळाचे परिसरात राजूर पोलीस स्टेशनची पेट्रोलिंग, नाकाबंदी व योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमण्यात येतो.

(२) हे खरे नाही.

लोणावळा भंडारदरा परिसरातील अनेक ट्रेकिंग स्पॉट परिसरात पर्यटक डीजे लावून मद्यपान करीत असल्याचे दिनांक ३० डिसेंबर २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले नाही.

(३) पर्यटनस्थळी पाण्यात बुडुन तसेच सेल्फीच्या नादात दरीत पडून मृत्यू झाल्याच्या राज्यातील सन २०१७ ते २०२० जानेवारी अखेरपर्यंतची माहिती पुढील प्रमाणे आहे.

| सन | बुडुन मृत्यू | सेल्फी घेतांना मृत्यू |
|---|---|---|
| २०१७ | ५८ | ०० |
| २०१८ | ५८ | ०१ |
| २०१९ | ६० | ०१ |
| ३१/०१/२०२० पर्यंत | ०२ | ०० |

(४) अपघात टाळण्यासाठी खालील प्रमाणे उपाय योजना करण्यात येतात.

१) वेगवेगळे मार्गदर्शनपर फलक लावणे.

२) पर्यटकांकरीता पर्यटन पोलीस पथकामार्फत गस्त घालणे व वेळोवेळी अतिरिक्त पोलीसांची गस्त घालण्यात येते.

३) पाण्यात बुडणाऱ्या व्यक्तींना बाहेर काढण्यासाठी लाईफ गार्ड व स्पीड बोटींची व्यवस्था करण्यात आली आहे.

४) ज्या ठिकाणी रस्त्यालगत खोल समुद्र किनारे आहेत. अशा ठिकाणी भरतीच्या वेळी आजूबाजूला पर्यटकांना बसण्यास किंवा उभे रहाण्यास तसेच दोरखंडाच्या सहाय्याने जाण्यास मज्जाव केला जातो. धोकादायक ठिकाणी लोखंडी रिलींग बसविण्याबाबत संबंधितांना प्रस्ताव सादर करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतीसाठी मुंढवा जॅकवेलमधून वर्षाकाठी साडेसहा टीएमसी पाणी मिळणेबाबत**

**(५) १२८३ (१३-०४-२०२०). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाने मुंढवा जॅकवेलमधून वर्षाकाठी साडेसहा टीएमसी पाणी उचलण्याची तयारी दाखवत गेल्या चार वर्षात जेमतेम १० टीएमसी पाण्याचा वापर केल्याने शेतीसाठी पाणी उपलब्ध होत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पाणी वापराबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुषंगाने शेतीसाठी पाणी उपलब्ध असूनही त्याचा वापर न करणाऱ्या जलसंपदा खात्यातील संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच, शेतीसाठी मुंढवा जॅकवेलमधून वर्षाकाठी साडेसहा टीएमसी पाणी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२८-०१-२०२१) :** (१) हे अशंत: खरे आहे. पुणे महानगरपालिका सांडपाण्यावर शुध्दीकरणाची प्रक्रीया न करता जुना मुठा कालव्यामध्ये पाणी सोडत असल्यामुळे शेतजमीन, विहिर व बोअरवाल मधील पाणी मोठया प्रमाणात दुषीत होत असल्यामुळे पाणीवापर करणेबाबत शेतकरी अनुत्सुक आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) जुना मुठा व उजवा कालव्याचे बांधकाम सन १८६० मध्ये झाले आहे. सदरील कालवा १२८ वर्षे जुना आहे. जुना मुठा कालव्याच्या विशेष दुरुस्त्याच्या रु.१४.२४ कोटी किमतीच्या तीन कामांना शासनाने सन २०१४ मध्ये अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदरील कामे जवळपास पुर्ण झाली आहेत. तसेच सदर कामांना महामंडळाकडून मंजूरी व निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांबाबत स्थापन केलेल्या समितीच्या अहवालाबाबत

**(६) १२८४ (२२-०३-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने स्थापन केलेल्या बेदखल कुळ अभ्यास समितीने माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान कोकणचा दौरा करून कोकणातील बेदखल कुळांच्या समस्यांबाबत शासनाला अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालात समितीने कोणत्या उपाययोजना सुचवल्या आहेत आणि त्यावर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२३-०२-२०२१) :** (१), (२) व (३) या विभागाच्या शासन परिपत्रक दिनांक १२/९/२०१४ अन्वये, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम,१९४८ कोकणातील विशेषत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील बेदखल कुळांच्या समस्यांचे सर्वंकष अभ्यासाकरिता विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. यासंदर्भात विभागीय आयुक्त यांच्या दिनांक १९/१/२०१७ च्या पत्रान्वये, सदर समितीने अहवाल शासनास सादर केला. सदर अहवालातील शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत :-

१) महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमांच्या विविध कलमांत सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.
२) पीकपाहणीच्या नोंदी अद्ययावत ठेवणे.
३) कुळकायदयांच्या प्रकरणांतील दावे चालविणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे.
४) सर्व प्रलंबित दावे एक वर्षात निकाली काढण्यासाठी अतिरिक्त अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करणे.

५) कातकऱ्यांच्या घरठाणांबाबत यापूर्वी सादर केलेल्या अहवालातील शिफारशींप्रमाणे बेदखल कुळांच्या घरठाणांच्या जागांबाबत शिफारस आहे.
सदर समितीचा अहवाल स्वीकृतीसाठी शासनाला सादर करण्यात आला आहे.

---

**जिल्हा खनिकर्म अधिकारी, गडचिरोली यांना लाच स्वीकारताना अटक केल्याबाबत**

**(७) १३५२ (२२-०३-२०२०). श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा खनिकर्म अधिकारी, गडचिरोली यांना सुमारे एक लाख वीस हजार रुपयांची लाच स्वीकारताना माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यानच्या पहिल्या सप्ताहात अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबधित अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१८-०२-२०२१) :** (१) श्री. श्रीकांत र. शेळके, जिल्हा खनिकर्म अधिकारी, गडचिरोली यांनी तक्रारदारास रेती या गौण खनिजाचा वाहतुक परवाना बुक देण्याकामी रु. १,२०,०००/- इतकी लाच रक्कम स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले असून त्यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ (सुधारणा २०१८) च्या कलम ७ अंतर्गत पोलीस स्टेशन गडचिरोली येथे अ.प.क्र.५४१/२०१९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) व (३) विभागीय चौकशी नियम पुस्तिका व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार श्री. श्रीकांत र. शेळके, जिल्हा खनिकर्म अधिकारी, गडचिरोली यांना शासन सेवेतून तात्काळ दिनांक ०२ डिसेंबर २०१९ रोजीच्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

---

**मुंबई शहर परिसरात वृद्ध नागरिकांच्या होत असलेल्या छळाबाबत**

**(८) १५७० (२२-०३-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वृद्ध नागरिकांना सुरक्षा प्रदान व आधार देणारा कायदा सन २००७ या कालावधीत अस्तित्वात येऊनही मुंबई शहर परिसरात मालमत्ता व अन्य कारणांमुळे मोठ्या प्रमाणात वृद्ध नागरिकांचा छळ झाल्याने सुमारे ५० पेक्षा जास्त वृद्ध नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी किती व्यक्तींविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे,
(३) तसेच, वृद्ध नागरिकांच्या सुरक्षा प्रदान करण्याबाबत व वृद्ध पालकांचा सांभाळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (२५-०२-२०२१) :** (१) व (२) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सन २०१५ ते जानेवारी, २०२० या कालावधीत जेष्ठ नागरिकांच्या हत्येबाबत एकूण ३६ गुन्हे दाखल असून त्यापैकी ३४ गुन्हे उघड आहेत. सदर गुन्ह्यामध्ये ६३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

(३) ज्येष्ठ नागरीकांच्या सुरक्षिततेकरीता बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

१) स्थानिक पोलीस ठाणे स्तरावर हद्दीतील ज्येष्ठ नागरीकांची नोंदणी करण्यात येते. सदर नोदी वेळोवेळी अदयावत ठेवल्या जातात.

२) पोलिस ठाण्यातील संबंधीत अधिकारी व अंमलदार हे आठवडयातुन किमान एक वेळा तरी एकटे राहणाऱ्या जेष्ठ नागरीकांची भेट घेवुन त्यांच्या समस्यांचे निरसन करून योग्य ते सहकार्य करतात.

३) मोहल्ला कमिटी व शांतता कमिटी सदस्यांच्या बैठकीत ज्येष्ठ नागरीकांच्या सुरक्षतेबाबत योग्य त्या सुचना देण्यात येतात. तसेच पोलिस ठाणे स्तरावरील वेळोवेळी ज्येष्ठ नांगरीकांच्या बैठका घेतल्या जातात. त्यामध्ये त्यांच्या अडीअडचणी समजुन घेवुन आवश्यक ती मदत केली जाते .

४) स्थानिक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक (जनसंपर्क) हे पोलीस अंमलदारांच्या मदतीने त्यांच्या हद्दीत राहणाऱ्या जेष्ठ नागरीक यांच्या घरात (घरकाम करणाऱ्या व्यक्ती, सेवा पुरविणाऱ्या संस्था) इत्यादी माहीती संकलीत करण्यात येते

५) सर्व पोलीस ठाण्यांना ज्येष्ठ नांगरीकांच्या घरात घरगडी म्हणून काम करणा-या नोकरांची संपूर्ण माहिती फोटोसहीत पोलीस ठाण्याच्या अभिलेखावर ठेवण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. त्याप्रमाणे कारवाई करण्यात येते.

६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक २८.११.२०१३ अन्वये पोलीस ठाणे स्तरावर ज्येष्ठ नागरीक सुरक्षा समिती स्थापन करुन त्यामध्ये स्थानिक एन जी ओ प्रतिनिधींचे सहकार्य घेण्याबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

७) ब्युरो ऑफ पोलीस रीसर्च ॲड डेव्हलेपमेन्ट भारत सरकार, केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून ज्येष्ठ नागरीकांसाठी कम्युनिटी पोलीसिंगबाबत निर्गमीत करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून बृहमुंबईतील सर्व प्रादेशिक विभागामार्फत पोलीस ठाण्यांना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.

८) मुख्य नियंत्रण कक्ष (१००) येथे ज्येष्ठ नागरीकांच्या तक्रारी दुरध्वनावरुन प्राप्त होताच त्यांची तक्रार नोंदवहीत नोंद घेवून सदरच्या तक्रारी पुढील कार्यवाहीकरीता विनाविलंब तक्रारदार राहत असलेल्या संबंधीत पोलीस ठाण्यात परस्पर कार्यवाहीकरीता कळविण्यात येतात. त्या तक्रारीसंबंधीची पुढील कार्यवाही संबधीत पोलीस ठाणे करीत असते. त्यानुसार ज्येष्ठ नागरीकांस तात्काळ पोलीस मदत पाठवुन त्यांच्या समस्यांचे निरसन पोलीस ठाण्यामार्फत केली जाते.

९) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील पोलीस ठाण्यात ज्येष्ठ नागरीकांबाबत घडलेल्या गुन्हयांची तातडीने दखल घेण्यात येते. असे गुन्हे तात्काळ दाखल करण्यात येवून त्यांचा योग्य तो तपास करुन कायद्यातील तरतुदीनुसार संबधीत आरोपींना अटक करण्यात येते व सखोल तपासाअंती दोषारोपत्रे न्यायलयात दाखल करुन आरोपींवर कठोर शासन होईल याबाबत न्यायालयात पाठपुरावा करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अतिरिक्त आयुक्त, वस्तू व सेवाकर विभाग, नागपूर यांच्या अधिपत्याखालील कार्यरत उपायुक्तांना लाच स्वीकारताना केलेली अटक**

**(९) १६११ (२२-०३-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिरिक्त आयुक्त, वस्तू व सेवाकर विभाग, नागपूर यांच्या अधिपत्याखालील कार्यरत उपायुक्तांना दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास दहा लक्ष रुपयांची लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने रंगेहाथ पडकले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी केलेल्या चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, त्यानुसार दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१८-०२-२०२१) :** (१) होय.

(२), (३) व (४) आरोपी लोकसेवक श्री. बाळासहेब तु. देखमुख यांच्याविरुद्ध दिनांक ०७ जानेवारी, २०२० रोजी पोलीस स्टेशन शिवाजीनगर, जि. नांदेड येथे गु.र.नं. ०४/२०२०, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम ७ अन्वये, गुन्हा दाखल करण्यात आला असून वित्त विभगाच्या दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या आदेशान्वये त्यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

---

**मुंबईतील गोरेगाव हब मॉल समोरील चेंबरमध्ये पडल्याने दोन कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(१०) १६९० (२२-०३-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगाव हब मॉल समोरील चेंबरमध्ये पडल्याने दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास दोन कामगारांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२५-०२-२०२१) :** (१) होय.

(२) वनराई पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिनांक ३१.१२.२०१९ रोजी सदरची घटना घडलेली असून त्याची अपमृत्यू नोंद घेण्यात आलेली आहे. दिनांक २८.०१.२०२० रोजी मा.सदस्य,राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्यासोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर दोन मयत इसमांचा चेंबरमध्ये पडून मृत्यू झालेला असून, सदरची घटना नैसर्गिक आपत्ती सदरता मोडत नाही. त्यामुळे आर्थिक मदत देता येणार नाही. तथापि, मयत इसमांच्या नातेवाईकांना मानवतावादी दृष्ट्रीकोनातून मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत देणेबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी मागणी केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रावेर, सावदा, फैजपूर व यावल (जि.जळगाव) शहरातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची व जळगाव येथील पोलीस मुख्यालयाच्या इमारतीची दुरूस्ती करण्याबाबत

**(११) १८१२ (२२-०३-२०२०). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर, सावदा, फैजपूर व यावल (जि.जळगाव) या चारही शहरातील पोलीस कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या निवास्थानाची दुरवस्था झाल्यामुळे या इमारतींची दुरुस्ती व नवीन बांधकाम न केल्यास मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, जळगाव शहरातील पोलीस मुख्यालयाच्या आवारातील निवासस्थानांची व पोलीस मुख्यालयाच्या नवीन इमारतीची दुरुस्ती प्रदीर्घ कालावधीपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शहरातील निवासस्थानांची व जळगाव येथील पोलीस मुख्यालयाच्या इमारतीची दुरूस्ती तसेच नवीन बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१७-०२-२०२१) :** (१) सदर शहरांतील पोलीस सेवा निवासस्थाने ही कौलारु व ब्रिटीशकालीन असून अत्यंत जीर्ण व खराब झालेली आहेत.

(२) पोलीस मुख्यालय, जळगाव येथे ३०० निवासस्थाने कंडम करुन महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत सप्टेंबर, २०१९ पासून २५२ नवीन निवासस्थाने बांधण्यात येत आहेत. पोलीस अधीक्षक, जळगाव कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम २००३ मध्ये पूर्ण झाले असून सदर इमारत सन २००३ पासून वापरात असून सध्या सुस्थितीत आहे.

(३) पोलीस अधीक्षक, जळगाव यांच्या अधिपत्याखालील रावेर, फैजपूर, धरणगाव व भुसावळ तालुका या ठिकाणी सेवा निवासस्थाने बांधकामाबाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस

गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे कार्यवाहीधीन आहेत. निधी उपलब्धतेनुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे. सावदा येथे सेवा निवासस्थाने बांधकामाचा प्रस्ताव प्राधान्यक्रमानुसार पोलीस महासंचालक, म.रा. यांच्या कार्यालयामार्फत पोलीस गृहनिर्माण महामंडळाला पाठवण्यात येणार आहे.

यावल येथे पोलीस निवासी इमारतींच्या दुरुस्तीसाठी रु.७१,५१,१४४/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मलकापुर (जि. बुलढाणा) येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या दुरावस्थेबाबत**

**(१२) २२४३ (२२-०३-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि. बुलढाणा) येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची अतिशय दयनीय अवस्था झाली असल्याची बाब दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पोलिस कर्मचारी निवासस्थानांचे दरवाजे, खिडक्या, स्वच्छतागृहे निकामी झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, मलकापूर शहर व ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीमधील पोलीस कर्मचाऱ्यांची निवासस्थाने दुरुस्त करण्याबाबत अथवा नवीन प्रस्ताव मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१७-०२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) मलकापूर (शहर व ग्रामीण) पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस कर्मचा-यांकरिता २९९ निवासस्थाने बांधण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे कार्यवाहीधीन आहे. उक्त प्रस्तावास प्राधान्यक्रम व निधी उपलब्धता मर्यादेत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**न्हावाशेवा (ता.उरण, जि.रायगड) पोलीस ठाण्याच्या इमारतीचे काम रखडल्याबाबत**

**(१३) २४२५ (२२-०३-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्हावाशेवा (ता.उरण, जि.रायगड) पोलीस ठाण्याच्या इमारतीला भूखंड मिळूनही इमारतीचे काम निधी अभावी रखडले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पोलीस ठाण्याची इमारत पूर्ण होऊनही आवश्यक निधी उपलब्ध

नसल्यामुळे अंतर्गत सोईसुविधांच्या अभावी कर्मचा-यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून इमारतीसाठी आणखी ५० ते ६० लाख रूपये निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून पोलीस ठाण्याच्या इमारतीच्या अपूर्ण कामांसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१८-०२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

१) न्हावाशेवा पोलीस ठाणे इमारतीकरिता पोलीस महासंचालक यांनी जेएनपीटी प्रशासनाकडे जागेची मागणी करण्यात आली होती. परंतु, जे एन पी टी प्रशासनाने पोलीस ठाणे इमारतीकरिता जागा उपलब्ध करुन दिलेली नाही अथवा त्याकरिता कोणताही भूखंड आरक्षित केलेला नाही. त्यामुळे इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव अद्याप तयार झालेला नसून इमारत बांधकामासाठी निधीची कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही.

२) न्हावाशेवा पोलीस ठाणे इमारतीचे बांधकाम अद्याप सुरु झालेले नाही

(३) न्हावाशेवा पोलीस ठाणे इमारतीकरिता जेएनपीटी प्रशासनाकडून जागा उपलब्ध झाल्यावर त्या जागेवर पोलीस ठाणे इमारत बांधकामासाठी निधी उपलब्धतता व प्राधान्यक्रमा आधारे कार्यवाही करण्यात येईल. तसेच, जेएनपीटी प्रशासनाने इमारत बांधकाम करुन देण्याची तयारी दर्शविल्यास शासनाच्या परवानगीने जेएनपीटी प्रशासनाकडून इमारत बांधण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दक्षिण मुंबईतील काळाचौकी, शिवडी व ना.म.जोशी मार्गावर असलेल्या पोलीस वसाहतीच्या दुरुस्तीबाबत

**(१४) २४४८ (२२-०३-२०२०). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील काळाचौकी, शिवडी व ना.म.जोशी मार्गावर असलेल्या पोलीस वसाहतीतील इमारती जीर्ण होऊन त्यांची मोठ्या प्रमाणात पडझड होत असल्याने या इमारतींच्या दुरुस्तीसाठी गृह विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाला निधी उपलब्ध करुन देते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधीतून सार्वजनिक बांधकाम विभाग इमारत दुरुस्तीचे काम ज्या कंत्राटदारांना देते ते कंत्राटदार निकृष्ट दर्जाचे काम करतात, त्यामुळे दुरुस्त केलेले प्लास्टर कांही दिवसात पडून इमारती धोकादायक होतात अशा तक्रारी पोलीस वसाहतीतील कुटुंबियांनी स्थानिक आमदार व शासनाकडे वारंवार केल्यानंतर उक्त तक्रारीनुसार स्थानिक आमदारांनी गृह विभागाकडे या दुरुस्ती कामाची चौकशी करण्याबाबत निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कंत्राटदाराविरुध्द व इमारती दुरुस्तीच्या कामाची देखरेख न करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१८-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) स्थानिक विधानसभा सदस्य यांनी काळाचौकी पोलीस वसाहतीबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे दिनांक ०६.०६.२०१८ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.
(३) काळाचौकी येथील पोलीसांच्या निवासी इमारतींच्या दुरुस्तीसाठी रु.५,१२,५४,१९४/-आणि रु.५८,५४,६३६/-इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून उक्त निधी सा.बां.विभागाला वितरीत करण्यात आला आहे.

शिवडी येथील पोलीसांच्या निवासी इमारतींच्या दुरुस्तीसाठी रु.६,१४,०९,२५०/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रु.५,१२,९९,१७९/- इतका निधी सा.बां.विभागाला वितरीत करण्यात आला आहे.

ना.म.जोशी मार्ग येथील पोलीसांच्या निवासी इमारतींच्या दुरुस्तीसाठी रु.५१,४३,३६६/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रु.३६,००,३५६/- इतका निधी सा.बां.विभागाला वितरीत करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अहवालानुसार उक्त निधीतून केलेली कामे ही निविदेतील विनिर्देशानुसार चांगली व गुणवत्तापूर्वक झालेली असून दुरुस्ती केलेल्या भागाची हानी झालेली नसून इमारती सुस्थितीत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील एमटी विभागातील पोलीस उप महानिरिक्षकाविरुद्ध केलेल्या तक्रारीबाबत**

**(१५) २६९३ (२२-०३-२०२०). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील एमटी विभागात कार्यरत असलेल्या पोलीस उप महानिरिक्षकांच्या विरोधात (डीआयजी) विनयभंगाचा आरोप करणारी अल्पवयीन तरुणी दिनांक ०६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास घरातून बेपत्ता झाल्याची तक्रार तरुणीच्या पालकांनी पोलीसात दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेपत्ता तरुणीने मला शोधण्याचा प्रयत्न करु नये तसेच माझ्या आत्महत्येस डीआयजी जबाबदार असतील अशी चिठ्ठी लिहून ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार संबंधित उप महानिरिक्षकांविरुद्ध (डीआयजी) शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व तरुणीच्या शोधाची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२३-०२-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) श्री. निशिकांत मोरे, पोलीस उप महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, पुणे यांचेविरोधात तळोजा पोलीस ठाणे, गु.र. क्र. २६०/२०१९, कलम ३५४ (अ) (१) (१), ५०६ भा.दं.वि. सह बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम- २०१२ चे कलम ८, ९ (अ) (४), १० अन्वये दिनांक २६/१२/२०१९ रोजी १७. २० वा. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच श्री. मोरे यांना शासन आदेश दिनांक ०९.०१.२०२० रोजी शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

तसेच दिनांक १४.०१.२०२० रोजी सदरच्या तरुणीचा शोध लागला असून सदर अपहरणाच्या गुन्हयातील आरोपीला दिनांक १५.०१.२०२० रोजी अटक करण्यात आली आहे.

---

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संशोधकांच्या शोधप्रबंधाबाबत

**(१६) २९०५ (०६-०४-२०२०). श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाकडून वेळेत निधीची पूर्तता न केल्यामुळे पी.एच.डी. चे संशोधकाचे शोधप्रबंध विद्यापीठाच्या आवक-जावक विभागाकडे गत चार महिन्यापासून पडून असल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२५-०२-२०२१) :** (१) खरे नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर विद्यापीठाचे जीपीओ येथे खाते आहे. सदर निधी जीपीओ येथे जमा करण्यात येतो. तद्नुषंगाने वित्त व लेखा विभागाकडून निधीची पूर्तता वेळेत करण्यात आलेली आहे. त्यामुळे पी.एच.डी. संशोधकाचे शोधप्रबंध विद्यापीठाच्या आवक-जावक विभागाकडे प्रलंबित राहत नाहीत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाडा विभागातील उक्त आठ जिल्हयांत निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या शेती व दुग्ध व्यवसायाची झालेले नुकसान

**(१७) ३००२ (०९-०४-२०२०). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागातील संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड,लातूर, धाराशिव आणि बीड या आठही जिल्हयांतील शेतकरी कमी-अधिक प्रमाणात दुग्ध व्यवसायाकडे वळले असून शासनाच्या गाई-म्हशी वाटपांबाबत असलेल्या योजनांचाही संबंधित शेतकरी जोडधंदा म्हणुन दुग्धव्यवसाय करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आठही जिल्हयांत शेतक-यांनी उत्पादित केलेले दूध हे शासकीय, सहकारी संस्था व खासगी अशा तीन वेगवेगळया स्तरावर संकलित केले जात असुन भीषण दुष्काळामुळे निर्माण झालेली पाणी टंचाई व अवेळी झालेल्या पावसामुळे शेती पिकांचे उत्पादनही घटल्याने शेतक-यांचे शेती तसेच दुग्धव्यवसाय या जोड धंद्यातही नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन मराठवाडा विभागातील उक्त आठ जिल्हयांत निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीवर कायम स्वरुपी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (१८-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे. मराठवाडा विभागामध्ये नेहमी पर्जन्यमान कमी होत असल्यामुळे विभागातील शेतकऱ्यांनी दुग्धव्यवसाय हा शेतीस पूरक असलेला व्यवसाय जोडधंदा म्हणून स्विकारलेला आहे. पशुसंवर्धन विभागाच्या राज्य योजनांतर्गत योजनेमार्फत ५०/७५ % अनुदान तसेच मराठवाडा पॅकेजद्वारे दूधाळ जनावरांचे वाटप शेतकऱ्यांना केले जाते. त्यानुसार शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळाल्याने शेतकरी दुग्धव्यवसायाकडे वळले आहेत.
(२) व (३) मराठवाडा विभागात शासन, सहकार व खाजगी स्तरावर दूध संकलन केले जात आहे, ही बाब खरी आहे. तसेच विदर्भ मराठवाडा योजनेंतर्गत विभागातील नांदेड, लातुर, उस्मानाबाद व जालना या ४ जिल्हयामध्ये मदर डेअरीमार्फत दूधाचे संकलन करण्यात येत आहे. तथापि, भीषण दुष्काळी परिस्थितीमुळे दुध उत्पादकांचे नुकसान झाल्याबाबतची कोणतीही तक्रार शासनाकडे प्राप्त झाल्याचे दिसून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

**पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, मलकापूर (जि.बुलढाणा) यांच्यावर कारवाई करण्याबाबत**

**(१८) ३०२३ (२७-०३-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, मलकापूर (जि.बुलढाणा) यांनी रेल्वे स्टेशन वर कॅन्टींग व्यवसाय करणाऱ्या मालकास अश्लील शिवीगाळ व समाजाबद्दल अपशब्द वापरून अशोभनीय कृत्य केल्याची बाब दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ मलकापूर, जिल्हा बुलढाणाच्या अध्यक्षांनी उपरोक्त बाबत सखोल चौकशी करून मलकापूर शहर पोलीस निरीक्षकावर कारवाई करणेबाबत दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी जिल्हा पोलिस अधीक्षक, बुलढाणा यांना दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने मलकापूर रेल्वे स्टेशन वर कॅन्टींग व्यवसाय करणाऱ्या इसमास मारहाण करून त्यांच्या परिवारातील महिलांबाबत अपशब्द वापरून अश्लील भाषेत जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्या संबंधित पोलीस निरीक्षक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२३-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) होय,

(३) दिनांक ३१.१२.२०१९ च्या निवेदनाच्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी, मलकापूर यांनी चौकशी केली आहे. त्यामुळे पोलीस निरीक्षक यांचेवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहर येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या परिवारांना चांगले निवासस्थाने उपलब्ध होण्याबाबत**

**(१९) ३५९२ (२३-०३-२०२०). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक पोलीस मुख्यालय नाशिक शहर येथे पोलीस कर्मचाऱ्यांच्या परिवारांना चांगले निवासस्थाने उपलब्ध व्हावे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत माननीय गृह राज्यमंत्री (शहरे) यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे नियोजन दिनांक ३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मंत्रालय येथे करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३ एप्रिल, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त देखील दिनांक १ जून २०१८ रोजी निश्चित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक पोलीस मुख्यालय नाशिक शहर येथील पोलीस कर्मचाऱ्यांना चांगली निवासस्थाने उपलब्ध व्हावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत?

**श्री. अनिल देशमुख (१८-०२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) पोलीस आयुक्तालय, नाशिक शहर, यांच्या आस्थापनेवरील पोलीस कर्मचारी यांचेकरिता सेवा निवासस्थाने बांधण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे कार्यावाहीधीन आहे. प्राधान्यक्रम व निधी मर्यादामुळे सदर प्रकल्प महामंडळाने स्थगित ठेवलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोरेगाव पश्चिम येथील पोलीस वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत**

**(२०) ३८०४ (२३-०३-२०२०). श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव (मुंबई) पश्चिम येथे शास्त्री नगर व तीन डोंगरी परिसरातील पोलीस वसाहतीतील इमारती मोडकळीस आल्यामुळे तिथे राहणाऱ्या पोलिस कुटुंबियांचा जीव धोक्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पोलिस वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणते धोरण आखले आहे तसेच त्याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(३) असल्यास, या पोलिस वसाहतीतील कर्मचाऱ्यांना ५०० चौ.फूटाची घरे शासनामार्फत बांधून देण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (१८-०२-२०२१) :** (१) व (२)

१) तीन डोंगरी, गोरेगांव (पश्चिम), मुंबई येथील पोलीस वसाहतीमधील एकूण ८ इमारती व शास्त्रीनगर येथील इमारत क्र.१० असून सदर इमारतीची देखभाल व दुरुस्ती ही सा.बां. विभागाच्या यांच्या देखरेखीखाली आहे. उक्त इमारती हया धोकादायक आहे असे सा.बां. विभाग, अथवा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कळविण्यात आलेले नाही.
२) उक्त इमारतींच्या दुरुस्तीच्या कामांसाठी सन २०१८-१९ आणि सन २०१९-२० या वित्तीय वर्षात अनुक्रमे रु.१,०२,५१,९५९/- (रुपये एक कोटी दोन लाख एकावन्न हजार नऊशे एकोणसाठ फक्त) आणि र.१,१०,८३,७१६/- (रुपये एक कोटी दहा लाख त्र्याऐंशी हजार सातशे सोळा फक्त) इतका निधी सा.बां.विभागास वितरित करण्यात आलेला आहे.

(३) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.आर.एस.ए-०११६/प्र.क्र.२३/पोल-७, दिनांक ०१.१२.२०१६ अन्वये पोलीस कर्मचा-यांना ४५-५० चौ.मी. (म्हणजेच ४८४ ते ५३८ चौ.फुट) इतक्या चटई क्षेत्रफळाची निवासस्थाने बांधण्याबाबतची तरतूद आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घनसावंगी (जि.जालना) तालुक्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत बांधलेल्या विहिरीबाबत

**(२१) ३९४६ (२३-०३-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील सन २०११-१२ या कालावधीत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत बांधलेल्या ९२ अवैध विहिरींची चौकशी सन २०१३ या कालावधीत एसीबीकडे वर्ग करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१७ या कालावधीत एसीबी कडून प्रत्यक्ष विहिरींची तपासणी करून चौकशी अहवाल तयार करण्यात आला असून चौकशी होऊनही अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झाली नसल्याची बाब दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१८-०२-२०२१) :** (१) सन २०११-१२ मध्ये महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील मौजे कुंभार पिंपळगांव येथील २० विहीरींची पहाणी केली असता, तेथील विहीरींच्या कामात मोठया प्रमाणात अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आल्याने विहीरींच्या कामामध्ये अनियमितता व भ्रष्टाचाराबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्यात आली.
(२), व (३) सदर प्रकरणी ग्रामविकास विभागाच्या दिनांक १३ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या आदेशान्वये य प्रकरणाशी संबंधित लोकसेवक १) श्री. शेख शकील मोहम्मद खलील (शाखा अभियंता तथा तत्कालीन पालक तांत्रिक अधिकारी, जि.प. जालना), २) धोंडीभाऊ भा. काळे (तत्कालीन ग्रामविकास अधिकारी) ३) श्री. अंशिराम भि. कुंटले (तत्कालीन सरपंच, कुंभार पिंपळगाव) ४) श्री. पुंडलीक ल. रोकडे (रोजगार सेवक) यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम १७ (अ) प्रमाणे तपास/चौकशी करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राधिकृत करण्यात आले आहे. दोषींवर दिनांक २१ जुलै २०२० रोजी पोलीस ठाणे, घनसावंगी येथे गु. र. नं. २७१/२०२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपासाची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील दूध धारक शेतक-यांना दुधाचे पैसे मिळत नसल्याबाबत**

**(२२) ४१२० (०९-०४-२०२०). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दूध धारक शेतक-यांना मागील पाच महिन्यांपासून दुधाचे पैसे मिळत नसल्याबाबतची तक्रार करण्याकरिता दूधधारक शेतक-यांनी मा.मुख्यमंत्री यांची भेट माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेतली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन दूधधारक शेतक-यांना त्यांचे थकीत दुधाचे पैसे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (१५-०२-२०२१) :** (१) अशी भेट घेतली असल्याचे निर्दशनास आलेले नाही.

(२) व (३) सन २०२०-२१ करिता रु.१८९,१२,७९,०००/-इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला असून आजपर्यंत दूध खरेदीच्या देयकावर एकूण रु.४६,८६,१६,०००/-इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गुटखा तस्करी रोखण्यासाठी आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३२८ अन्वये गुन्हा दाखल करण्याबाबत**

**(२३) ४२३८ (२४-०३-२०२०). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुटखा तस्करी रोखण्यासाठी आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३२८ अन्वये गुन्हा दाखल करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील कलम अजामिनपात्र असून गुन्हा सिध्द झाल्यास जन्मठेपही होऊ शकते असे असले तरीही या कलमाचा अंतर्भाव न करता गुन्हा नोंदविण्यासाठी टाळाटाळ करतात असे गंभीर आरोप अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एफडीएच्या आयुक्त यांनी थेट पोलीस महानिरिक्षक यांच्याकडे ३२८ कलमासह एफआयआर नोंदवून घेण्याच्या सूचना राज्यातील पोलीसांना द्याव्यात अशी लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (२६-०२-२०२१) :** (१) होय.
(२) नाही.
सदर प्रकरणी पोलीस विभागाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने वेळीच योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.
(३) होय.
आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी भा.दं.वि. कलम १८८, २७२, २७३, व ३२८ कलमांतर्गत प्रथम खबरी अहवाल दाखल करुन घेण्याचे आदेश सर्व पोलीस स्टेशनला देण्यात यावेत अशी विनंती डिसेंबर, २०१८ मध्ये केली आहे.
(४) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांच्या विनंतीच्या अनुषंगाने पोलीस महासंचालकांच्या दिनांक २४/१/२०१९ च्या पत्रान्वये तात्काळ सर्व पोलीस घटक प्रमुखांना आवश्यक निर्देश देण्यात आले आहेत. तसेच दिनांक १६/७/२०२० च्या पत्रान्वये पुन:श्च वरीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत सर्व घटकप्रमुखांना सूचना दिल्या असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मंगळवेढा व सांगोला (जि.सोलापूर) या विभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या बांधकामाबाबत

**(२४) ४४४० (२४-०३-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा व सांगोला (जि.सोलापूर) या दोन तालुक्यांसाठी विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय स्थापन करण्यास शासन स्तरावरून मंजुरी मिळाली असून सध्या जुन्या पोलीस स्टेशनमध्ये हे कार्यालय अपुऱ्या जागेत चालवले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांधकाम साहित्याच्या किमतीप्रमाणे अजूनही बांधकाम पूर्ण करण्यासाठी १५ ते २० लाखांची शासन स्तरावरील निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बांधकामासाठी १८ लाख रुपये निधी मंजूर झाला असून ठेकेदाराने वेळेत काम पूर्ण केले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून शासनाने ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. अनिल देशमुख (१८-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) उपविभागीय पोलीस अधिकारी, मंगळवेढा, यांचे प्रशासकीय इमारत बांधकामाकरिता शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक ०५.०३.२०२० अन्वये रु.१८.६० लक्ष इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. प्रशासकीय इमारतीचे बांधकामाच्या जागेत बदल झाल्यामुळे कामास विलंब झालेला आहे. परंतु सदर कामासाठी सन २०१९-२० च्या दरसूचीनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता व अतिरिक्त रु.२६.३५ लक्ष इतक्या निधीची आवश्यकता आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी प्राप्त निधीच्या मर्यादेत काम करण्यात आले असून उक्त कामास सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानवी तस्करीच्या आंतरराष्ट्रीय टोळीच्या तपासासाठी चंद्रपूर जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी आठ जणांचे विशेष पथक स्थापन केल्याबाबत**

**(२५) ४५५० (२४-०३-२०२०). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), अॅड.शहाजीबापू पाटील (सांगोले) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवी तस्करीच्या आंतरराष्ट्रीय टोळीच्या तपासासाठी चंद्रपूर जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी आठ जणांचे एक विशेष पथक स्थापन केले आहे, हे खेर आहे काय,
(२) असल्यास, मानवी तस्करी प्रकरणातील तीन महिलांना पोलीसांनी अटक केली असून त्यांनी २० मुलींची विक्री उत्तर भारतातील वेगवेगळया राज्यात केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व प्रकरणाची चौकशी केली आहे काय, असल्यास चैकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच राज्यातील मानवी तस्करीला प्रतिबंध घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२२-०२-२०२१) :** (१) होय.
(२) मानवी तस्करी प्रकरणातील तीन महिलांना पोलीसांनी अटक केली आहे हे खरे आहे. तथापि, त्यांनी २० मुलींची विक्री उत्तर भारतातील वेगवेगळ्या राज्यात केली असल्याचे तपासात निष्पन्न झालेले नाही.
(३) होय, फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार पोलीस स्टेशन रामनगर येथे गु.र.क्र. १५५९/२०१९ कलम ३६५, ३६६ अ, ३६७, ३७०, ३७६ (छ), ३५४, ३२८, ३२३ भा.दं.वि. सहकलम ४ बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम, २०१२, दिनांक २९/१२/२०१९ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात घटनास्थळाचा पंचनाम करण्यात आला, पिडीतेचे जन्मप्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले आहे. फिर्यादीचे सविस्तर बयाण नोंदविण्यात आले. पिडीतेच्या जबानीवरुन तिचे अल्पवयीन असतांना अपहरण करुन देहव्यापार करण्यासाठी विक्री केली असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने आरोपींविरुध्द दिनांक १०/१/२०२० रोजी कलम ४, ५ व ६ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक अधिनियम, १९५६ प्रमाणे कलमवाढ करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात ११ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांपैकी ३ महिला आरोपी चंद्रपूर येथील असून उर्वरित ८ आरोपी हरियाणा राज्यातील आहेत. खटला न्यायप्रविष्ट आहे.
(४) महाराष्ट्र राज्यात अनैतिक मानवी वाहतूकीस प्रतिबंध करण्याबाबत खालीलप्रमाणे

उपाययोजना करण्यात येत आहेत.

१) राज्य गुन्हे अन्वेषण विभागात अनैतिक वाहतूक प्रतिबंध समन्वय कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

२) राज्यात १२ ठिकाणी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

३) लैंगिक शोषणाच्या विळख्यात अडकलेल्या महिलांची सुटका, पुनर्वसन करण्यासंदर्भातील बाबींचे समन्वयन करण्याकरिता अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे.

४) १८ वर्षाखालील हरवलेल्या मुलांच्या बाबतीत कायदेशीर पालकांकडून तक्रार प्राप्त झाल्यावर थेट अपहरणाचा गुन्हा (एफ.आय.आर.) दाखल करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

५) हरविलेल्या बालकांसंबंधी तपासाचा कालावधी ४ महिन्यांपेक्षा अधिक झाला असेल व शोधण्यास यश मिळत नसेल अशा तक्रारी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडे पुढील तपासाकरिता सुपूर्द करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

६) परदेशात नोकरीचे अमीष दाखवून हवाई मार्गे तस्करी करण्यात येते, याबाबत विमानतळावर सुरक्षेकरिता तैनात असणाऱ्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यांना सतर्कता बाळगणेबाबत कळविण्यात आले आहे.

७) समाजातील दुर्लक्षित घटक, महिला व बालक यांच्या संबंधात दाखल होणाऱ्या गुन्ह्यांना प्रतिबंध आणि गुन्हे रोखण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्याबाबत पोलीस घटकांना कळविण्यात आले आहे.

८) अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध संबंधात भा.दं.वि. ३७०, ३७०(अ) कलमे लावण्याबाबत व इसमांविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

९) हरविलेल्या बालकांना शोधण्यासाठी ऑपरेशन मुस्कान मोहिम राबविण्यात येते.

---

**भामरागड (जि.गडचिरोली) तालुक्याच्या छत्तीसगड सीमेवर अबुझमाडच्या जंगलालगत झालेल्या चकमकीत दोन नक्षलवाद्यांना ठार केल्याबाबत.**

**(२६) ४८५८ (२५-०३-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामरागड (जि.गडचिरोली) तालुक्याच्या छत्तीसगड सीमेवर अबुझमाडच्या जंगलालगत झालेल्या चकमकीत दोन नक्षलवाद्यांना ठार केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठार केलेले नक्षलवादी नव्हते तर शेतकरी होते असा दावा नेलगंडा परिसरातील

नागरिकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार संबंधीत दोषी अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२२-०२-२०२१) :** (१) होय.
(२) नागरिकांनी दावा केला हे खरे असले तरी ठार झालेल्या संबंधित व्यक्ती केंद्र शासनाद्वारे प्रतिबंधित CPI माओवादी पार्टीचे जनमिलीशिया सदस्य असल्याची नोंद पोलीस मदत केंद्र, धोडराज येथील अभिलेखावर आहे. एक सक्रीय माओवादी कमांडर असल्याबाबत एका आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्याने ओळख पटविली आहे.
(३) होय, प्रत्येक चकमकीची राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या (NHRC) मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा दंडाधिकारी यांच्या मार्फत चौकशी करण्यात येते. सदर प्रकरणाची चौकशी जिल्हा दंडाधिकारी यांच्या आदेशाने उपविभागीय दंडाधिकारी, एटापल्ली यांच्या कडून सुरु आहे.
(४) चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कल्याण-डोंबिवली येथे मोबाईल कंपनीच्या कंत्राटदाराला खंडणीसाठी धमकावल्याबाबत

**(२७) ५५३० (२५-०३-२०२०). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली येथे मोबाईल कंपनीच्या कंत्राटदाराला खंडणीसाठी मारझोड करुन धमकवल्याच्या प्रकरणी दिनांक २५ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास कोळसेवाडी पोलिस स्थानकांत नगरसेवकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला व याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ?
**श्री. अनिल देशमुख (२६-०२-२०२१) :** (१) होय.
(२) परिमंडळ-३, कल्याण मधील कोळसेवाडी पोलीस ठाणे येथे भा.दं.वि. १४३, १४७, १४९, २९४, ३२३, ३८५, ५०४ व ५०६ या कलमांतर्गत गु.र.क्र. ७०९/२०१९ दाखल करण्यात आला आहे.
(३) पुढील तपास सुरु आहे.

---

### खडकसावंगा (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथील बेंबळा प्रकल्पाजवळ बांधकाम

**करण्यात आलेले मत्स्यबीज उत्पादन केंद्र सुरु करण्याबाबत**

**(२८) ५७४७ (१३-०४-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकसावंगा (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथील बेंबळा प्रकल्पाजवळ मत्स्यबीज निर्माण करण्यासाठी मत्स्य बीज उत्पादन केंद्राचे बांधकाम पुर्ण होवुनही विभागाने मत्स्यबीज उत्पादन केंद्र सुरु केले नसल्याचे दिनाक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोई समाज व इतर नागरिकांना व्यवयास तसेच रोजगार मिळावा म्हणुन मत्स्यबिज उत्पादन केंन्द्राची उभारणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेंबळा प्रकल्पाजवळ बांधकाम करण्यात आलेले मत्स्यबीज उत्पादन केंद्र सुरू करुन दुर्लक्ष करणाऱ्या विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (२२-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

सदरचे केंद्र दिनांक १५/०६/२०१९ पासून श्री. कुंदन परडके यांना १५ वर्षाकरीता भाडेपट्टीने देण्यात आलेले असून संबंधितांना सन २०१९-२० ची ठेका रक्कम भरणा केलेली आहे. केंद्रावर काही तांत्रिक अडचणी असल्यामुळे मत्स्यबीजाचे संगोपन केले होते. केंद्रावरील तांत्रिक अडचणी टप्प्या-टप्प्याने दूर करुन ठेकेदार मत्स्यबीज उत्पादन चालू करणार आहे.

(२) हे खरे नाही.

सदर केंद्राची उभारणी जिल्ह्यातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था, मत्स्यशेतकरी यांना उत्तम प्रतीचे मत्स्यबीज उपलब्ध करुन देणे व जिल्ह्यातील मत्स्यबीज कमतरतेची पुर्तता करणे या करीता करण्यात आली आहे.

(३) सदरचे केंद्र १५ वर्षांकरीता भाडेपट्टीने देण्यात आलेले असून केंद्र सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला (जि.अकोला) शहरात महावितरणाच्या कार्यकारी अभियंत्यास**
**लाच घेतांना पकडल्याबाबत**

**(२९) ६०२८ (२७-०३-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) शहरात दोन ठिकाणी सौर उर्जा प्रकल्प उभारणीच्या निरीक्षण अहवाल मंजूरीसाठी लाच घेताना महावितरणाच्या कार्यकारी अभियंत्यास दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास रंगेहाथ पकडण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी खदान पोलीस स्टेशन अकोला येथे गुन्हा दाखल करण्यात

आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१८-०२-२०२१) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

सदर प्रकरणी आरोपी लोकसेवक श्री. प्रदीप रुपराव पुनसे, कार्यकारी अभियंता, चाचणी विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, अकोला यांच्या विरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ (सुधारीत २०१८) च्या कलम ७ नुसार पोलीस स्टेशन खदान, जि.अकोला येथे अ.प.क्र. ५१/२०२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) व (४) मुख्य अभियंता, म. रा. वि. वि. मं. कंपनी, परिमंडळ, अकोला यांच्या दिनांक ०४ फेब्रुवारी २०२० रोजीच्या आदेशान्वये आरोपी लोकसेवक श्री. प्रदीप रुपराव पुनसे यांना निलंबित करण्यात आले आहे.

---

## गृहनिर्माण मंत्री यांच्या निवासस्थानी युवकाला करण्यात आलेली मारहाण

**(३०) ११३६६ (१२-०९-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील कावेसर भागात राहणाऱ्या एका अभियंत्याला फेसबुकवर पोस्ट टाकल्याचा जाब विचारत गृहनिर्माण मंत्री यांच्या बंगल्यावर नेऊन त्यांच्या समक्ष मारहाण करण्यात आल्याची बाब दिनांक ८ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मारहाण प्रकरणांमध्ये मुंबई पोलीस दलातील ३ पोलिसांचाही सहभाग असून त्या अभियंत्याने याबाबत पोलिस स्टेशनला तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला असता उलट त्यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतरही अभियंत्याने गुन्हा नोंदवण्याचा आग्रह धरल्यामुळे गुन्हा नोंदविण्यात आला परंतु त्यामध्ये गृहनिर्माण मंत्री यांच्या नावाचा समावेश करण्यास पोलिसांनी नकार दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. अनिल देशमुख (२४-०२-२०२१) :** (१) सदर गुन्ह्याचा अद्याप पर्यन्त केलेल्या तपासामध्ये

सुरक्षा गार्ड यांच्याकडे केलेला तपास, तपासण्यात आलेले इतर साक्षीदार, उपलब्ध सी.सी.टी.व्ही.फूटेज यावरुन गृहनिर्माण मंत्री यांच्या समक्ष मारहाण झाल्याबाबत तपासामध्ये निष्पन्न झालेले नाही.

(२), (३) व (४) सदर फिर्याद नोंदविताना पोलीसांनी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सदर प्रकरणात ३ पोलीस अंमलदार व इतर ७ आरोपींना अटक करुन त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दिनांक ०७.१२.२०२० रोजी दोषारोपपत्र सादर केलेले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र पोलीस सेवेतील (मपोसे) १७ अधिकारी यांना आयपीएस पदी पदोन्नती देण्याबाबत**

**(३१) ११५५९ (१३-०९-२०२०). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पोलीस सेवेतील (मपोसे) १७ अधिकारी हे आयपीएस बनण्यासाठी पात्र असतानाही गत अडीच वर्षापासून सक्तीच्या प्रतीक्षेत असल्याची बाब दिनांक २२ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र पोलीस सेवेने आय.पी.एस संवर्गातील १७ रिक्त पदांसाठी प्रस्ताव बनविला असताना त्यात सन २०१९ या कालावधीतील ९ जागा आणखी वाढल्या असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२३-०२-२०२१) :** (१), (२) व (३) केंद्र शासन अधिसूचना दिनांक २५.०५.२०१८ अन्वये निवडसुची सन २०१६ करीता ९, अधिसूचना दिनांक ३०.०९.२०२० अन्वये निवडसुची सन २०१७ करीता ७ व निवडसुची २०१८ करीता १० याप्रमाणे राज्य पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांची भारतीय पोलीस सेवेत पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच निवडसुची सन २०१९ करीता ९ पदे व निवडसुची २०२० करीता ०६ पदे अशा एकूण १५ रिक्त पदे केंद्रीय गृह मंत्रालयाने निश्चित केलेली असून सदर पदांवर अधिकाऱ्यांची निवड करण्याकरीता सविस्तर प्रस्ताव केंद्रिय लोकसेवा आयोगास पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्यामधील अनेक जिल्ह्यामध्ये लॉकडाऊन काळात**

**मस्जीदीमधून अजाण देण्यास बंदी घातल्याबाबत**

**(३२) ११५८० (१३-०९-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यामधील अनेक जिल्ह्यामध्ये लॉक डाऊन काळात मस्जीदीमधून अजाण देण्यास बंदी घालण्यात आली असताना काही कालावधीनंतर काही जिल्ह्यांमध्ये सदर आदेश शिथील करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही अहमदनगर जिल्ह्यात व तालुक्यांमध्ये मस्जीदमधून देण्यात येणाऱ्या अजानसाठी बंदी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२२-०२-२०२१) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किन्हवली,कसारा, वाशिंद व खर्डी (ता. शहापूर,जि.ठाणे) व परळी (ता. वाडा,जि.पालघर) येथील पोलीस केंद्राची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३३) ११९०४ (१०-०८-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्हवली, कसारा, वाशिंद व खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) व परळी (ता.वाडा, जि.पालघर) येथील पोलीस केंद्राची पूर्णत: दुरवस्था झाल्याची बाब माहे एप्रिल-मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील सर्व ठिकाणच्या पोलीस केंद्राच्या नवीन कार्यालयांच्या इमारतीचे बांधकाम करणे, कार्यालयाभोवती संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे तसेच कार्यालयात अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडे वारंवार मागणी करुनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व सदरहू कामे न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, चौकशीनुसार या पोलीस केंद्राच्या दुरुस्ती व सुशोभिकरणाच्या कामांना मंजुरी व निधी देऊन तातडीने कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१७-०२-२०२१) :** (१), (२), (३) व (४)

१) किन्हवली (ता.शहापूर, जि. ठाणे) पोलीस ठाण्याची इमारत सुस्थितीत आहे.
२) कसारा (ता.शहापूर, जि.ठाणे) पोलीस ठाण्याची इमारत जुनी आहे परंतु वापरण्यायोग्य आहे.
३) पोलीस ठाणे, वाशिंद बांधकाम करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे कार्यवाहीधीन आहे. निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
४) खर्डी हे पोलीस ठाणे नसून दूरक्षेत्र आहे व ते सुस्थितीत आहे.
५) पोलीस ठाणे, वाडा हद्दीतील परळी हे दुरक्षेत्र सध्या सुस्थितीत असून रंगरंगोटी केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घोडधरण चिंचणी (ता.शिरुर, जि.पुणे) येथील मच्छिमारीसाठी मागविण्यात आलेल्या निविदाबाबत**

**(३४) १२०८७ (१६-०९-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडधरण चिंचणी (ता. शिरुर, जि. पुणे) येथील जलाशयातील मच्छिमारीसाठी मत्स्यव्यवसाय विभागाने दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास ई निविदा मागविण्यात आल्या असुन ५ निविदांपैकी २ निविदा अपात्र केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या ई निविदा करिता आवश्यक असणारी कागदपत्रे ही फक्त ऑनलाईन पध्दतीने अपलोड करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ५ ई-निविदा पैकी एका अपात्र निविदा धारकाला ई-निविदा मंजूर केली असुन या अपात्र निविदा धारकाच्या विरोधात ई निविदा भरते वेळीस अटी व शर्तीचे पालन केले नसल्याचे पात्र निविदा धारकाने मत्स्यव्यवसाय आयुक्त, मुंबई यांचेकडे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अपात्र निविदा धारकाने ठेका रक्कम भरली नसून त्याला चुकीच्या पध्दतीने मुदतवाढ दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपात्र निविदा धारकाची निविदा रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. अस्लम शेख (२२-०२-२०२१) :** (१) नाही.

घोडधरण चिंचणी (ता.शिरुर, जि.पुणे) येथील जलाशयातील मच्छिमारीसाठी मत्स्यव्यवसाय विभागाने दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानूसार प्राप्त पाचही निविदा तांत्रिक व वाणिज्यिक समितीद्वारे पात्र ठरविण्यात

आलेल्या आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
घोड जलाशयाचे ठेकेदार यांनी सन २०१७-१८ व २०१८-१९ या दोन वर्षांची मंजूर तलाव ठेका रक्कम विहीत मुदतीत भरणा केलेली आहे. तथापि विभागाद्वारे निर्गमित शासन निर्णय दिनांक ०३/०७/२०१९ मधील मुद्दा क्र. २७ अनूसार अवर्षणामुळे तलाव ठेका समितीने लगतच्या सन २०१९-२० या वर्षासाठी विनामुल्य ठेका मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.
(५) घोडधरण चिंचणी जलाशयातील मच्छिमारीसाठी मत्स्यव्यवसाय विभागास प्राप्त पाचही निविदा तांत्रिक व वाणिज्यिक समितीद्वारे पात्र ठरविण्यात आलेल्या आहेत. तथापि याबाबत शासनास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने नियमोचित योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**घोडधरण चिंचणी (ता.शिरुर, जि.पुणे) या धरणातील मत्स्यव्यवसायाच्या लिलावाची कार्यवाही पुणे विभागाकडून होणेबाबत.**

**(३५) १२०८९ (१६-०९-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घोडधरण चिंचणी (ता.शिरुर, जि.पुणे) येथील जलाशयातील मच्छिमारीच्या मत्स्यव्यवसाय लिलावाची कार्यवाही अहमदनगर जिल्हयांतील मत्स्यव्यवसाय विभागामार्फत होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिंचणी धरणासाठी शिरुर तालुक्यातील चिंचणी, शिंदोडी, गुनाट, निमोणे, मोटेवाडी,गोलेगाव, तर्डोबाचीवाडी या गावांतील शेतकऱ्यांचे हजारो हेक्टर क्षेत्र धरणासाठी संपादित केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या धरणातील मत्स्यव्यवसायाच्या लिलावाची कार्यवाही पुणे विभागाच्या मत्स्यव्यवसाय विभागातंर्गत होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (२२-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही. घोडधरण चिंचणी (ता. शिरुर, जि. पुणे) हा १००० हेक्टरवरील जलाशय असल्याने मत्स्यव्यवसाय लिलावाची कार्यवाही आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई यांचे अध्यक्षतेखालील आयुक्तस्तरीय तलाव ठेका समितीमार्फत होते.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
घोडवेअर प्रकल्पाअंतर्गत विविध प्रयोजने उदा. कॅनाल भरावासाठी, डंपींग कॅनालकरीता, स्टोअर रुम, मुरुम खाणी, नवीन गावठाण साईट व पाझर तलावाकरीता पुणे जिल्ह्यातील शिरुर

तालुक्यातील मौजे चिंचणी, मौजे शिंदोडी, मौजे गोळेगाव, मौजे निमोणे येथील एकूण ५८९.१६ हे. आर. क्षेत्र संपादित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) विलंब नाही.

---

**कोरोनामुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(३६) १२१७९ (१३-०९-२०२०). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.राजकुमार पटेल (मेळघाट), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी हा कोरडा, ओला दुष्काळ, वादळी वारे, गारपीट, अतिवृष्टी या निसर्ग चक्रामुळे अडचणीत आलेला असताना सध्याच्या कोरोनाच्या पार्श्वभुमीवर अनेक गावातील शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माढा पंढरपूर, माळशिरस, करमाळा तालुक्यातील केळी, द्राक्षे, डाळींबसह अनेक फळबागातील फळे विक्री अभावी शेतात पडून कुजून गेल्याने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना विषाणूच्या कालखंडात ज्या शेतकऱ्यांच्या पिकांचे, फळाचे, भाज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना शासनाने तातडीने नुकसान भरपाई देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१७-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

माहे २९ फेब्रुवारी, २०२० ते ३ मार्च, २०२० व दिनांक ४ मार्च, २०२० ते ३१ मार्च, २०२०, माहे एप्रिल २०२०, मे,२०२० या कालावधीत अवकाळी पावसामुळे शेती/फळ पिकांचे नुकसान झाले आहे. दिनांक ३ जून २०२० रोजीच्या निसर्ग चक्रीवादळामूळे शेती/फळ पिकांचे अहवाल निरंक आहे.

(२) अंशत: खरे आहे

(३) शेतमाल वाहतुकीला उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्या मार्फत प्रत्येक तालुक्यात शेतकऱ्यांच्या शेतमाल वाहतूक करणाऱ्या वाहनांना परवानगी देण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली होती. यामध्ये माढा, पंढरपूर, माळशिरस, करमाळा या तालुक्यांचाही समावेश आहे. त्यानंतर शेतमाल वाहतुकीस कोणत्याही प्रकारचा परवान्याची गरज नसल्याचे जाहीर केल्याने शेतमाल वाहतुक सुरळीत होण्यास मदत झाली आहे.

कोरोना विषाणुच्या पार्श्वभूमीवर विविध शेतकरी कंपन्यांना प्रोत्साहीत किरण्यात आले, त्यानुसार सोलापूर शहरात व पुणे, मुंबई मधील काही सोसायट्यामध्ये शेतकऱ्यांना थेट शेतमाल विक्रीकरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. यामध्ये एकूण ३८ शेतकरी गटांनी ७७.८४ क्विंटअल शेतमाल वितरीत केला.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लाचलुचत प्रतिबंधक विभागाचे दाखल केलेल्या गुन्ह्याचे सुमारे ९३ टक्के खटले सत्र न्यायालयामध्ये प्रलंबित असल्याबाबत

**(३७) १२४१३ (१८-०८-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दाखल केलेल्या गुन्ह्यांचे सुमारे ९३ टक्के खटले सत्र न्यायालयांमध्ये प्रलंबित असल्याची बाब दिनांक ३० जून, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित असलेले खटले लवकरात-लवकर निकाली काढण्यासाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१८-०२-२०२१) :** (१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा कार्यवाही केलेल्या, अपसंपदा प्रकरणी, तसेच अन्य भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये सन २०१५ ते दिनांक ३० जुन २०२० पर्यंत एकूण ५१२८ गुन्ह्यांमध्ये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहेत. त्यापैकी ५७५ खटल्यांमध्ये न्यायालयाने निकाल दिला असून एकूण ४५५३ खटले (८९%) न्यायालयात प्रलंबित आहेत.

(२) व (३) मा.न्यायालयात प्रलंबित खटले लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येते.

१) मा. विशेष न्यायालय, मा. सत्र न्यायालय, मुंबई आणि मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृन्मुंबई विभागातर्फे एक सहायक पोलीस आयुक्त व एक पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांची पैरवी अधिकारी व उर्वरीत इतर सर्व घटक विभाग येथे सुध्दा एक पैरवी अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

२) मा. न्यायालयात खटल्याच्या सुनावणी तारखेला तपासी अधिकारी, फिर्यादी व साक्षीदार हजर राहतील तसेच मा. न्यायालयाने मागणी केल्यानुसार विहीत वेळेत अहवाल, म्हणणे सादर होईल याची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्वारे दक्षता घेण्यात येते.

३) साक्षीदारांच्या संपर्कात राहून त्यांना सुनावणीपूर्वी प्रश्नावलीनिहाय ब्रिफ करुन त्यांच्यासमोर घटनाक्रम पूर्नःनिर्मित (Reconstruction) करण्यात येतो. साक्षीदार/पंच

यांना साक्षीदरम्यान गुन्हयाची कागदपत्रे अवलोकनाकरिता देण्यात येतात. तसेच दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्याकरिता सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फतीने मा. न्यायालयास विनंती करण्यात येते.

४) न्यायालयात सुनावणी सुरु होण्यापूर्वी सदर प्रकरणाचा आराखडा तयार करुन सुनावणीचे अखंड वेळापत्रक बनविण्यात येते. तक्रारदार, पंच व साक्षीदार यांची सरतपासणी तसेच उलट तपासणी निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

५) जिल्हा प्रमुख न्यायाधीश, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे खटले चालविणारे न्यायाधीश, सरकारी अभियोक्ता यांची भेट घेऊन न्यायालयात प्रलंबित असलेल्या गुन्हयांचा जास्तीत जास्त निपटारा होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतो. तसेच खटले प्रथम प्राधान्याने सुनावणीसाठी घेण्याबाबत त्यांना विनंती करण्यात येते.

६) मा. न्यायालयाकडून वेळोवेळी प्राप्त होणारे समन्स/वॉरंट/नोटीस तसेच दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे व तात्काळ पालन करण्यात येते.

७) तसेच प्रलंबित खटले लवकरात लवकर निकाली काढण्याकरिता महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, अपर महांसचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या घटकांचे विभागीय पोलीस अधीक्षक संबंधीतांना वेळोवेळी मार्गदर्शन करीत असतात.

---

**नांदेड जिल्हयात मटका,जुगार यासह अनेक अवैध व्यवसाय सुरू असल्याबाबत**

**(३८) १२६२६ (१३-०९-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील रामतीर्थ (ता. नायगाव),कंधार व भोकर पोलिस स्टेशन अंतर्गत मटका, जुगार,यासह अनेक अवैध व्यवसाय सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्हयात दरदिवशी जवळपास दोन कोटी रुपयांची उलाढाल मटक्यातून होत असून जिल्हयात कायदा व सुव्यवस्ठेचा प्रश्न निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिस अधीक्षक, नांदेड यांच्या दुर्लक्षितपणामुळे नांदेड जिल्हयात स्थानिक पोलिस प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने ग्रामीण व शहरी भागात अवैध व्यवसाय सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अवैध व्यवसायात सुरू करण्यास पाठबळ देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (१८-०२-२०२१) : (**१) नांदेड जिल्ह्यातील रामतीर्थ, कंधार व भोकर पोलीस स्टेशन येथे माहे जानेवारी २०२० ते ऑक्टोंबर २०२० पर्यंत खालीलप्रमाने गुन्हे दाखल आहेत.
जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत एकूण ३७ गुन्हे दाखल असून एकूण १२६ आरोपींकडून रु.५,१५,२११/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.
तसेच दारुबंदी कायद्यांतर्गत एकूण १६६ गुन्हे दाखल असून एकूण १८४ आरोपींकडून रु.५,७०,४४५/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.
तसेच गुटखा संबंधी एकूण १० गुन्हे दाखल असून एकूण १४ आरोपींकडून रु.११०६८८/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.
(२) नांदेड जिल्ह्यात चोरुन मटका व जुगार व इतर प्रकारे जुगार अनुषंगाने माहे जानेवारी २०२० ते ऑक्टोंबर २०२० पर्यंत जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत ५०३ गुन्हे दाखल असून १०४६ आरोपींकडून एकूण रु.२५,२०,८५१/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नांदेड जिल्ह्यात चोरुन अवैध धंदे चालवित असल्याचे निदर्शनास आल्यास दोषी व्यक्तीविरुद्ध तात्काळ कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही.
(३) हे खरे नाही.
(४) नांदेड जिल्ह्यात चोरुन लपुन अवैध धंदे करणारे व्यक्तींविरुद्ध माहिती काढून दोषी व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करुन, सर्व प्रकारच्या अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन करणेबाबत, नांदेड जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेश्न प्रभारी अधिकारी, उप विभागीय पोलीस अधिकारी यांना स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.
(५) विलंब झालेला नाही.

---

**आर्वी (जि.वर्धा) पोलीस स्टेशन येथील पोलीस उपनिरीक्षक यांनी**
**कोरोना संसर्गाच्या कालावधीत नागरिकांना त्रास दिल्याबाबत**

**(३९) १३०३३ (१३-०९-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी (जि.वर्धा) पोलीस स्टेशन येथील पोलीस उपनिरीक्षक श्री.चंद्रकांत टावरे यांनी कोरोणा विषाणूचा प्रसार थांबविण्यासाठी बंदोबस्तामध्ये मौजा देऊरवाडा (ता.आर्वी, जि.वर्धा) या पॉईंटवर सेवा बजावताना तेथील गावकऱ्यांना व गुरे चराईला जाणाऱ्या लोकांना त्रास देऊन मारहाण केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्वी येथील सुप्रसिध्द डॉक्टर श्री.लव्हाळे व डॉ.श्री.पंकज अजमिरे हे सेवा देण्याकरिता अमरावती व अकोला जिल्ह्यामध्ये आठवड्यातून तिन दिवस जात असून देऊरवाडा पॉईंटवर श्री.चंद्रकांत टावरे यांनी त्या डॉक्टरांना शिवीगाळ करून परत पाठविल्यामुळे रूग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच मा.श्री.बंटीजी भांगडीया, विधानसभा सदस्य हे दिनांक २४ मे, २०२० रोजी टोणा येथे एका समारंभाकरिता आले असता त्यांचा सुध्दा अपमान करून त्यांचेकडे प्रवासपास

असतांनासुध्दा एक तास अडवूण ठेवून लोकप्रतिनिधीना उध्दटपणाची वागणुक देऊन अपमाणीत केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लोकप्रतिनीधी, डॉक्टर व गावकऱ्यांना विनाकारण त्रास देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (११-०२-२०२१) :** (१), (२), (३)

कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर "लॉकडाऊन" च्या कालावधीत बॉर्डर सीलिंग पोस्ट देऊळवाडा, ता. आर्वी, जिल्हा वर्धा येथे कर्तव्य बजावत असतांना पोउपनि चंद्रकांत टावरे यांनी गांवकरी व गुरे चारणा-या लोकांना त्रास देवुन मारहाण केल्याचे निदर्शनास आले नाही.

पोउपनि चंद्रकांत टावरे हे कर्तव्यावर असतांना आर्वी येथील डॉ.श्री.लव्हाळे व डॉ.श्री.पंकज अजमिरे हे जिल्हयांच्या बाहेर जात असतांना त्यांचेजवळ जिल्हयांच्या बाहेर जाण्यासाठी सक्षम अधिका-यांचा पास नसल्यामुळे त्यांना आर्वी येथे परत पाठविण्यात आले होते. त्यांना शिवीगाळ केल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच श्री.टावरे यांनी मा.श्री.बंटीजी भांगडीया, वि.स.स. यांना उध्दट पणाची वागणुक देवुन अपमानित केल्याचे निर्दशनास आले नाही.

(४) पोउपनि श्री.चंद्रकांत टावरे यांचेकडून मौजे देऊळवाडा येथे बॉर्डर सिलींग पॉईन्टवर चेक पोस्टवर लोकप्रतिनिधी, डॉक्टर व गावातील लोकांना विनाकारण त्रास देत असल्याबाबत पो.स्टे. आर्वी येथे तक्रारी प्राप्त नाहीत. तसेच श्री. टावरे यांनी नियमाप्रमाणे कर्तव्य बजावले असल्याने त्यांचेवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील मरीन ड्राईव्ह, सी रोड येथील शीवसदन इमारतीच्या मालकाने इमारत सॅनिटाईझ करण्यास विरोध केल्याबाबत.

**(४०) १३१०१ (१५-०७-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मरीन ड्राईव्ह, सी रोड येथील शीवसदन इमारतीचे मालक श्री.अजय नायर यांनी सदर इमारत सॅनिटाईझ करण्यास तीव्र विरोध केल्यामुळे या भागातील मरीन ड्राईव्ह पब्लिक, कोविड ग्रुप आणि कोविड पोलीस नरेश कपूर यांनी दिनांक ७ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असतानाही याबाबत पोलीसांनी कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत मालकांवर तक्रार दाखल होऊनही अद्याप कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, सदर प्रकरणी तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. अनिल देशमुख (१७-०२-२०२१) :** (१) व (२) नाही.

सदर बाबत मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्याच्या अभिलेख पडताळला तसेच दिनांक ०७.०७.२०२० रोजी कर्तव्यावर असणारे ठाणे अंमलदार यांच्याकडे चौकशी केली असता नरेश कपूर यांचा कोणताही तक्रार अर्ज प्राप्त नसल्याचे, तसेच ते स्वतःही तक्रार करण्यास पोलीस ठाण्यात आले नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

नरेश कपूर यांचा भ्रमणध्वनी प्राप्त करुन वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री.मृत्युंजय हिरेमठ यांनी स्वतः त्यांच्याशी संपर्क साधला असता अजय नायर हे शिवसदन इमारतीत सॅनिटायज करण्यात तयार असल्याचे व दिनांक २९.०७.२०२० रोजी नमुद इमारत सॅनिटायज केली असल्याचे नरेश कपूर यांनी सांगितले आहे. तसेच नरेश कपूर यांनी अजय नायर यांच्या विरोधात याआधी कोणतीही लेखी किंवा तोंडी तक्रार दिली नसल्याचे व आताही कोणतीही तक्रार नसल्याचे स्पष्ट सांगितले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाहीत.

---

**चांदिवली परिसरातील साकीनाका पोलीस स्टेशन व वसाहतीतील इमारतींच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४१) १३१८३ (१३-०९-२०२०). श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदिवली परिसरातील साकीनाका पोलीस वसाहतीच्या इमारती व साकीनाका पोलीस पोलीस स्टेशन इमारत धोकादायक स्थितीत असून या इमारतींची तात्काळ दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतींच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून निधी मिळणे आवश्यक असून शासन किती कालावधीत इमारतींच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अनिल देशमुख (१७-०२-२०२१) :** (१) व (२) चांदिवली, साकीनाका, अंधेरी (पूर्व), मुंबई येथील इमारत क्र.१५, १७, २८, २९, ३० अशा पाच इमारती (५८५ सदनिका) म्हाडा कार्यालयाकडून शासनाने पोलीस विभागाकरिता खरेदी केलेल्या आहेत. उक्त पाच इमारतींच्या अंतर्गत गिलावा, लादीकरण, दरवाजे, खिडक्या, स्वयंपाकगृहाचे ओटे इ. दुरुस्ती कामासाठी रु.२,९३,१५,६८५/- इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागास दिनांक ०३.०७.२०१७ रोजी वितरीत केला आहे. सदर निधीमधून २५५ सदनिकांची दुरुस्ती करण्यात आली आहे. उक्त पाच इमारतीपैकी इमारत क्र. २८, २९, ३० या इमारती सा.बां.विभागाने मे-२०१९ मध्ये धोकादायक घोषित केल्यामुळे सदर इमारतींना तात्पुरत्या स्वरुपात स्थिरता व आधार देण्याकरिता स्टील प्रॉप्स (टेकू) लावण्याकरिता रु.१०,४०,९७३/- इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रु.५,२०,४८८/- इतका निधी वितरीत करण्यात आला

आहे. इमारत क्र. २८, २९, ३० या इमारतींचा पुनर्विकास करण्याची प्रक्रिया कार्यवाहीधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घोड (ता.जि.अहमदनगर) जलाशयात चोरून मासेमारी होत असल्याबाबत**

**(४२) १३३१२ (१६-०९-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोड (ता.जि.अहमदनगर) जलाशयात चोरून मासेमारी करत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने घोड जलाशयात चोरुन मासेमारी करणाऱ्यां संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (२२-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) घोड जलाशयामध्ये चोरुन मासेमारी होत असलेबाबत संबंधीत ठेकेदार यांनी पत्राद्वारे सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, अहमदनगर यांना कळविल्यानूसार सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, अहमदनगर यांनी दिनांक ११/०३/२०२० रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार (ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर), तहसिलदार (ता. शिरुर, जि. पुणे), पोलिस स्टेशन, बेलवंडी व शिरुर यांना घोड जलाशयात ठेकेदाराचे ओळखपत्र न घेता चोरुन मासेमारी करणाऱ्या व्यक्तींस समज देवून नियमानुसार कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. त्या अनुषंगाने पोलिस स्टेशन, बेलवंडी मार्फत घोड जलाशयात चोरुन मासेमारी करणाऱ्यां विरुद्ध कायदेशिर कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरात मांत्रिकाच्या सल्ल्याने एका कोवळ्या बालकाला तापलेल्या विळ्याने चटके दिल्याबाबत**

**(४३) १३३५२ (१३-०९-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरात मांत्रिकाच्या सल्ल्याने एका कोवळ्या बालकाला तापलेल्या विळ्याने चटके दिल्याचा अघोरी प्रकार घडल्याचे दिनांक २० जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चटके दिल्यामुळे बालकाची प्रकृती अधिकच खालावल्यामुळे त्याला चुर्णी ग्रामीण रुग्णालयात भरती करण्यात आल्यानंतर ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरानी याबाबतची कल्पना स्थानिक पोलिसांना दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई करण्यात केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२२-०२-२०२१) :** (१) होय, सदरचा प्रकार पोलीस स्टेशन चिखलदरा अंतर्गत ग्राम चुर्णी येथील डॉक्टरांचे पथकास दिनांक १८/६/२०२० रोजी निदर्शनास आला.

(२) सदर बालकास उपचाराकरीता ग्रामीण रुग्णालय, चुर्णी येथे भरती केल्यानंतर सदर प्रकरणाबाबत पोलीसांना माहिती दिली.

(३) पोलीस स्टेशन, चिखलदरा येथे गु.र.क्र. १०४/२०२० कलम ३२४, ३४ भारतीय दंड संहिता सहकलम ३, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालणे व समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम, २०१३ अन्वये नोंद करण्यात आला. बालकाचे वडील सज्जु भुऱ्या तोटा, वय २८ वर्षे आणि शेजारी राहणारी व बालकावर अमानुष उपचार करणारी जिमाय कांडमा कास्देकर, वय ६५ वर्षे या दोन्ही आरोपींना अटक करण्यात येऊन कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. दोन्ही आरोपींविरुद्ध पुरावा गोळा करुन विशेष न्यायालयात क्र. ५३/२०२० दिनांक ९/९/२०२० अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली येथील पोलीस वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(४४) १३६४२ (१३-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली शहरातील प्रभाग १६ मधील पोलीस वसाहतीची दुरुस्ती तसेच नव्याने बांधणी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने किती निधीची तरतूद करण्यात आली आहे वा येत आहे तसेच या प्रस्तावावर किती कालावधीत अंमलबजावणी होणे अपेक्षीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१७-०२-२०२१) :** (१) व (२) सांगली शहरातील प्रभाग १६ मधील सांगली शहर पोलीस ठाणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता एकूण १९० नवीन निवासस्थाने बांधणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडे कार्यवाहीधीन आहे. निधी उपलब्ध होताच पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील निवासस्थान असलेल्या राजगृह येथे करण्यात आलेल्या तोडफोडीबाबत**

**(४५) १३७१२ (१३-०९-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील निवासस्थान असलेल्या राजगृह येथे दिनांक ७ जुलै, २०२० रोजी वा त्यासमारास सायंकाळी सहा वाजता मोठ्या प्रमाणात तोडफोड करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१२-०२-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) या प्रकरणी माटुंगा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.२४८/२०२० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमूद गुन्हयात दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून, सदरचा दावा न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाहीत.

---

**अकोला (जि.अकोला) येथील जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याबाबत**

**(४६) १३८१५ (१३-०९-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) येथील जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना अकोट बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यासाठी लाच मागताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक ९ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रामदासपेठ पोलीस स्टेशन, अकोला येथे गुन्हयाची नोंदविला आहे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने संबंधित उपनिबंधकाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१८-०२-२०२१) :** (१), (२), व (३),

तक्रारदार व त्यांच्यासोबत असलेले कर्मचारी त्यांचे सातव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती करण्याकरिता व ॲरिअर्स मंजूर होऊन प्रस्तावास मान्यता मिळवून देण्यासाठी आरोपी लोकसेवक डॉ.प्रविण हरिदास लोखंडे, जिल्हा उपनिबंधक, सहकार संस्था, अकोला यांनी आरोपी लोकसेवक श्री. अमरप्रीतसिंह सुरजीतसिंह सेठी, असिस्टंट कमिशनर, विक्रीकर विभाग, अकोला यांच्यासमवेत तक्रारदार यांच्याकडे ५ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक १० जून २०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला यांच्याकडे तक्रार केली.

सदर तक्रारीच्या पडताळणीनंतर सापळा कारवाई दरम्यान श्री. अमरप्रीतसिंह सुरजीतसिंह सेठी, असिस्टंट कमिशनर, विक्रीकर विभाग, अकोला यांनी २,००,००० रुपयांची लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांच्याविरुध्द आणि डॉ. प्रविण हरिदास लोखंडे, जिल्हा उपनिबंधक, सहकार संस्था, अकोला यांच्याविरुद्ध पो.स्टे. रामदासपेट, जि. अकोला येथे अप.क्र. १४१/२०२०, कलम-७ (ए) (सी), १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ (सुधारीत २०१८) अन्वये दिनांक ०९ जुलै, २०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी श्री. अमरजीतसिंह सुरजीतसिंह सेठी यांना वित्त विभगाच्या दिनांक १८ ऑगस्ट, २०२० रोजीच्या आदेशान्वये आणि डॉ. प्रविण हरिदास लोखंडे यांना सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक २९ जुलै, २०२० रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत लाभ मिळण्याबाबत**

**(४७) १३८४१ (१४-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत लाभ मिळण्याबाबत विधानसभा सदस्य बल्लारपूर यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १५ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१८-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाद्वारे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत सर्व शेतकऱ्यांना लाभ मिळण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. निवेदनाच्या अनुषंगाने पी.एम.किसान योजनेंतर्गत राज्यात दिनांक १४ डिसेंबर, २०२० अखेर एकुण ११२.७२ लाख शेतक-यांनी पी.एम.किसान

पोर्टलवर नोंदणी केली असून त्यापैकी एकुण १०२.३१ लाख शेतक-यांना एकूण रू.९४९०.२१ कोटी लाभ मिळालेला असून उर्वरीत पात्र शेतक-यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु असल्याचे सन्मानीय सदस्यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पणज (ता.अकोट, जि.अकोला) येथे नरबळी देवून हत्या करण्यात आल्याबाबत**

**(४८) १४४८२ (१३-०९-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पणज (ता.अकोट, जि.अकोला) येथील तेजस राजु जिवनलाल या तरुणाची गुप्तधन प्राप्तीच्या आमिषाने नरबळी देवून हत्या करण्यात आल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पणज येथील गणेश गजानन बोचे व त्याच्या अन्य ४ साथीदारांनी मिळून तेजस याचा नरबळी देवून हत्या केल्याबाबतची तक्रार तेजसचे वडील यांनी अकोट पोलीस स्थानक येथे दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने या प्रकरणी करण्यात आलेल्या तपासाचा व चौकशीचा तपशील काय आहे व या प्रकरणी किती जणांना अटक करण्यात आली असून त्यांचेवर कोणकोणत्या कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत,

(४) तसेच अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२२-०२-२०२१) :** (१) नाही.

(२) होय.

(३) गुन्हे तपासात तेजस जिवनलाल याचा मृत्यू नरबळी देऊन हत्या केल्याबाबत कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, भौतिक, परिस्थितीजन्य अथवा वैद्यकीय पुरावे आढळून आले नाहीत. मृतकाचे पीएम रिपोर्ट मध्ये मृत्यू पाण्यात बुडून झाल्याचा अहवाल वैद्यकीय अधिकारी यांनी दिला आहे. मृतकाचा मृत्यू घातपाताने झाल्याचे निष्पन्न झाले नसून सदर प्रकरणी कोणाचाही सहभाग आढळून न आल्याने अद्याप कोणासही अटक करण्यात आली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भांडुप (मुंबई) येथील ड्रिम्स मॉलमध्ये अनधिकृत कॉल सेंटरद्वारे नागरिकांची फसवणूक केल्याबाबत.**

**(४९) १४८५२ (१४-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडुप (मुंबई) येथील ड्रिम्स मॉलमध्ये अनधिकृत कॉल सेंटर उघडून नागरिकांची कर्ज, विमा इत्यादीच्या आमिषाने लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीला नवी मुंबई पोलिसांच्या सायबर सेलने अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अटक केलेल्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (२५-०२-२०२१) :** (१) होय.

(२) खारघर पोलीस ठाणे, सायबर सेल, गुन्हे शाखा, नवी मुंबई येथे दिनांक ०४.०४.२०१९ रोजी गु.र.क्र.१२८/२०१९ अन्वये माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० मधील कलम ६६(क) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आले असून त्यांना न्यायालयीन कोठडी मंजूर आहे. सदर गुन्ह्यातील अटक आरोपींची सर्व बँकेची खाती गोठविण्यात आली असून गुन्ह्यातील महत्वाचा आरोपीचा शोध चालू आहे. आरोपी मिळताच दोषारोप पत्र सादर करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तराळा (ता.मंगरूळपीर, जि.वाशिम) येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी शेतकरी मंडळांची जनावरांचे गोठे बांधण्याच्या मागणीबाबत**

**(५०) १४८५६ (१७-१२-२०२०). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तराळा (ता.मंगरूळपीर, जि.वाशिम) येथील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी शेतकरी बचत मंडळाने जनावरांसाठी गोठे बांधण्याबाबत जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त काम मंजूर करण्याबाबत जिल्हाधिकारी व कार्यक्रम अधिकारी, रोजगार हमी योजना, वाशिम यांना लेखी पत्राद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांची मागणी असतानाही शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी गोठे मंजूर करून कार्यारंभ आदेश व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१८-०२-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) लाभार्थ्यांनी सादर केलेला प्रस्ताव अपूर्ण असल्यामुळे कागदपत्रांची पूर्तता करुन प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत सचिव / सरपंच, ग्रामपंचायत, तऱ्हाळा यांना कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.